# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री.सर्जेराव रंगनाथ खिलारी

## मु.पो. करगणी, ता.आटपाडी, जि.सांगली



- एकूण १९.११ हे. क्षेत्रापैकी १२.०० हे. क्षेत्रावर आंबा, डाळींब, सिताफळ, चिंच व आवळा या फळपिकांची आधुनिक पध्दतीने लागवड.
- फळबागांसाठी ठिबक व इतर पिकांसाठी तुषार/रेनगनचा वापर.
- महिला बचतगट व कृषि विज्ञान मंडळाची स्थापना.
- शेतीपूरक व्यवसाय - मत्स्य व दुग्धव्यवसाय, पशु व शेळीपालन.
- परदेशात डाळींबाची निर्यात व १६ व्या जागतिक कृषि प्रदर्शनाचे निमित्ताने इस्त्राईल अभ्यास दौरा.
- शेती प्रदर्शन व जनावरांच्या मोठया यात्रा आयोजनात सहभाग.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. यज्ञेश वसंत सावे

### मु.पो. झाई (ब्राम्हणगाव), ता.तलासरी, जि.ठाणे



- वाहितीखाली असलेल्या ७.५० हे. वर फळबाग लागवड, भाजीपाला उत्पादन व निरनिराळया फुलपिकांची लागवड.
- हिरवळीचे खतासाठी धैंचा, ग्लिरीसिडीयाची लागवड.
- स्नेहा मत्स्यव्यवसाय विकास सहकारी संस्थेची स्थापना करुन या व्यवसायास चालना.
- आदिवासी पाडयांसाठी रस्ते करुन जाण्यायेण्याची सोय.
- सामूहिक विवाहास प्रोत्साहन देवून परिसरातील आदिवासी समाजाच्या विहिरी मंजूरीसाठी विशेष प्रयत्न.
- शेतीपूरक व्यवसाय - मत्स्य व दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. मधुकर चिंधूजी भलमे

## मु.पो. चारगाव (बु.), ता.वरोरा, जि.चंद्रपूर



- कोथिंबीर, भाजीपाला, सुर्यफूल पिकांचे सेंद्रिय शेती पध्दतीने उत्कृष्ट उत्पादन, स्वनिर्मित ६ फूट उंच कोथिंबीरीचे उत्पादन.
- मधुमक्षिकापालन व्यवसायामध्ये १०० मधमाशा वसाहती व दरवर्षी ४५० किलो मधनिर्मिती.
- महापीक अभियानांतर्गत ग्रामबिजोत्पादन यशस्वीपणे राबविले.
- शेतकऱ्यांच्या बचतगटाची स्थापना, कुटुंब नियोजन, ग्रामस्वच्छता अभियान, वृक्ष लागवड इ. सारख्या सामाजिक कार्यात सहभाग.
- निळे हिरवे शेवाळ एक वरदान, मिरची/पपईची सुधारीत लागवड यासारखी वैयक्तिक प्रकाशने.
- शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करुन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. गौसमहंमद सैपन शेख

### मु.पो.बोरामणी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर



- आदर्श द्राक्ष बागायतदार म्हणून परिसरात परिचीत, एकूण ३५ हे. क्षेत्रापैकी २७ हे. वर द्राक्ष लागवड.
- द्राक्षाच्या १० जातींची लागवड संपूर्ण सेंद्रिय शेती पध्दतीवर.
- रशियन द्राक्ष जातीपासून महादेव सिडलेस हे वाण विकसित.
- ४.५० एकरात ठिबक सिंचन वापरुन खरबूजाचे उत्पादन.
- पट्टा पध्दतीने ऊस लागवड करुन एकरी ८५ मे.टन उत्पादन.
- १० एकरावर टिश्यु कल्चर केळी लागवड करुन ६० किलो वजनाच्या घडाचे विक्रमी उत्पादन.
- बायोगॅस, सौरउर्जा वापरुन वीज टंचाईवर मात करण्यासाठी सायफन पध्दतीचा अवलंब.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. शिवनाथ भिकाजी बोरसे

### मु.भोयेगाव, पो.जोपूळ, ता.चांदवड, जि. नाशिक



- सेंद्रिय शेती पध्दतीने डाळींब लागवड, बांबू लागवडीसाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे.
- शेतकऱ्यांच्या समस्या शोध व बोध या स्वलिखीत पुस्तकाचे माध्यमातून शेतीविषयी प्रबोधन.
- इंडियन चेंबर ऑफ ॲग्रीकल्चरची स्थापना करुन किसान कृति आराखडयाची निर्मिती.
- खेडयातील कांदा विक्रीसाठी ट्रान्सपोर्ट व्यवसाय व घराच्या छतावरचे पाणी विहिरीत सोडण्याची कायमची व्यवस्था.
- शिवनाथ बोरसे हा सेंद्रिय खत बनविण्याचा नवा पॅटर्न.
- सन १९९५ पासून १०० टक्के शेती ठिबक पध्दतीने करतात.
- वेगवेगळया उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना माहिती देणे व शेतकरी प्रबोधनासाठी महाराष्ट्रभर भ्रमंती.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. दत्ताभाऊ कोंडजी लोनसुने

### मु.जांभरुन परांडे, पो.काटा, ता. जि. वाशिम



- एकूण २०.७५ हे. क्षेत्रापैकी ८.०० हे. माळरान जमिनीचे सपाटीकरण केले व धरणातील गाळाचा उपयोग करुन जमिन लागवडीयोग्य केली.
- सलग समतल चर, मातीनाला बांध, सिमेंट नालाबांध, शेततळे इ. स्वतःचे शेतीत केल्याने विहीरीला वर्षभर पाणी.
- गांडूळ खत प्रकल्प उभारुन १० एकरात सेंद्रिय सिताफळ लागवड.
- ठिबक सिंचनाद्वारे तुरीचे विक्रमी उत्पादन, ३ एकरात अंजीर लागवड करुन सभोवताल नारळ लागवड केलेली आहे.
- शेती कुंपनासाठी करवंद लागवड करुन फळे व काटेरी कुंपन असा दुहेरी फायदा.
- जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय – १० म्हशी व ४ गायी असून त्यापासून दररोज ३० ते ४० लिटर दुध उत्पादन.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. बाबासाहेब नानाभाऊ पिसोरे

### मु.पो. दौलावडगाव, ता.आष्टी, जि.बीड



- शेतात ५ कोटी लिटर क्षमतेचे शेततलाव करुन ७२ एकर क्षेत्रावर फळबाग केली, यामध्ये ५० एकरावर केशर आंबा.
- सात एकरात कांदा पिकाची लागवड करुन ३० टन विक्रमी उत्पादन.
- सेंद्रिय शेती पध्दतीने शेती करुन प्रमाणिकरण करुन घेतले आहे तसेच त्यासाठी १०० गायी पाळल्या असून त्याद्वारे गोमूत्र, सेंद्रिय खते, जीवामृत, दशपर्णी इ. तयार करणे.
- दोन गोबर गॅस प्लँट असून त्यापासून विद्युत तयार करणे आणि स्वयंपाक गॅसचा वापर.
- कृषि पर्यटन स्थापन केले असून त्यांचे केंद्रास जवळपास २००० पर्यटकांनी भेटी दिलेल्या आहेत.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. साहेबराव आबाजी काकडे

### मु. पारवा, पो. जांब, ता. जि. परभणी



- वाहितीखाली २० एकर क्षेत्र असून त्यामध्ये पेरु, चिकू, आवळा ही फळपिके, भूईमूगाची इक्रिसॅट पध्दतीने लागवड.
- ऊस उत्पादन घेत असून रसवंतीपासून नफा मिळवतात.
- कद्रु, चक्री भोपळा, कारली, दोडका इ. कमी कालावधीच्या भाजीपाल्याचे अधिक उत्पादन घेतात.
- मधुमक्याचे उत्पादन घेवून मुंबई बाजारपेठेत पाठविणे तसेच गाजर लागवडीचे कमी वेळात अधिक उत्पादन घेतात.
- सं. महिको ज्वारी ४०९४ चे एकरी २८.५० क्वि. उत्पादन.
- शिवशंकर सार्वजनिक वाचनालयाचे माध्यमातून विविध उपक्रम राबवितात.
- सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्याबाबत सन २००४ चा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा भूषण पुरस्कार प्राप्त.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. पंढरीनाथ सर्जेराव मोरे

### मु.पो. सांगवीभुसार, ता. कोपरगाव, जि.अहमदनगर



- ३० वर्षे जलव्यवस्थापनाचा अभ्यास करुन त्याद्वारे बागायती पिकांच्या पाण्याची गरज कशी कमी करता येईल याबाबत संशोधन.
- पाणी शुध्दीकरणासाठी सन २००३ मध्ये यु.पी.एम. मॅग्नेटिक कॅटॅलीक वॉटर कंडिशनर हे उपकरण तयार केले. त्याद्वारे क्षारयुक्त पाण्याचा शेतीमध्ये उपयोग करणे शक्य.
- शेतीक्षेत्रात विकसीत केलेली ५ संशोधने नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन, अहमदाबाद संस्थेमार्फत पुरस्कारासाठी निवड.
- क्षारपाणी व पाणी बचतीचे सोपी साधने हे पुस्तक प्रकाशित.
- विविध फळपिकांची लागवड करुन सेंद्रिय शेती पध्दतीने उत्पादन.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००८

## श्री. अरुण निंबाजी देवरे

### मु.पो. दाभाडी, ता.मालेगाव, जि.नाशिक



- वाहितीखाली एकूण ३.६० हे. क्षेत्र असून त्यापैकी २.०० हे. क्षेत्रावर मृदुला व आरक्ता डाळींबाची व ०.८० हे. क्षेत्रावर अंजीर लागवड.
- द्राक्ष निर्यात करीत असून प्री कुलींग व कोल्ड स्टोरेजची मालेगाव तालुक्यात उभारणी तसेच परीसरातील शेतकऱ्यांना द्राक्ष वाईन जातीची लागवड करण्यासाठी मार्गदर्शन.
- महाराष्ट्र डाळींब उत्पादक संशोधन केंद्र, पुणेचे संचालक तथा नाशिक विभागाचे अध्यक्ष.
- डाळींब उत्पादक संस्था स्थापन करुन डाळींब अनारदाना तयार करणेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन.
- सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात सक्रिय सहभाग.